महाराष्ट्र शासन
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

कार्यालय- विद्यापीठ अभियंता महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

दूरध्वनी क्र. ०२४२६-२४३२३५
फॅक्स क्र. ०२४२६-२४३६०१
ई-मेल uniengineermpkv@gmail.com

पत्ता :- मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी,
जि. अहमदनगर. पिन- ४१३ ७२२.

जाक्र.मफुकृवि/विअ/मध्यवर्ती परिसर/निवासस्थान परिपत्रक / २०२२ / १८२० दिनांक:- २९/ ०७ /२०२२

# परिपत्रक

विषय : मध्यवर्ती परिसर मफुकृवि, राहुरी येथील विविध वसाहतीमधील निवासस्थाने बाबत....

उपरोक्त विषयानुसार विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की दिनांक- २२.०४.२०२२ रोजी संपन्न झालेल्या १९४ व्या गृहवाटप समिती बैठकीत वाटप करण्यात आलेली बरीच निवासस्थाने अनेक अधिकारी / कर्मचारी यांचे कडुन आजतागायत ताब्यात घेण्यात आलेली नाहीत. गृहवाटप आदेशातील मुद्दा क्र. ०२ नियमानुसार १० दिवसात वाटप निवासस्थानाचा ताबा घेणे आवश्यक आहे यासाठी कोणतीही सबब चालणार नाही अन्यथा निवासस्थान वाटप आदेश आपोआप रद्द समजण्यात येईल. निवासस्थान वाटप करण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना सुचित करण्यात येते कि एकदा निवासस्थान वाटप झाल्यानंतर पुढील ०२ वर्षे संबंधित अर्जदारांच्या अर्जाचा गृहवाटप समिती विचार करणार नाही व त्यांचे गृहवाटप जेष्ठता यादीतील नाव वगळण्यात येईल.

तसेच रिक्ततेनंतर वाटप निवासस्थाने ०३ महिन्यात ताबा न मिळाल्यास संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना प्राप्त गृहवाटप आदेश आपोआप रद्द समजण्यात येईल. निवासस्थान मागणी अर्जदाराने प्रत्येक गृहवाटप सभेपुर्वी नविन अर्ज कार्यालय प्रमुख यांचे स्वाक्षरीने दिनांक व जावक क्रमांकासह करणे आवश्यक आहे. गृहवाटप समितीमार्फत वाटप नविन / बदली निवासस्थाने /पुढील श्रेणीतील निवासस्थाने हि सेवाजेष्ठता यादी/ प्रचलित गृहवाटप समिती नियम /निवासस्थान उपलब्धता यावर अवलंबुन असल्याने ते मिळतीलच असे नाही.

सबब, सदर परिपत्रक आपले अधिनस्त असलेले अधिकारी/ कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन द्यावे ही विनंती.

सदस्य सचिव
गृहवाटप समिती तथा विद्यापीठ अभियंता,
मफुकृवि, राहुरी